३ या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स

प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल, सर्व ग्राहकांचे आभार!
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी ॲण्ड नाष्टा सेंटर
संपूर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी

प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४६६ वा • बुधवार, ता. १० डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## माजी सरन्यायाधीशांवर बूटफेक प्रकरण आरोपी वकिलावर कोर्टातच चोप



**दिल्ली । रयत समाचार**

माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर न्यायालयात बूट फेकणारे वकील राकेश किशोर यांना गुरुवारी कडकडकडूमा कोर्ट परिसरातच इतर वकिलांकडून बेदम मारहाण करण्यात आली. न्यायालयाच्या प्रांगणातच चपलांनी तुफान चोप देत त्यांना धक्काबुक्की करण्यात आली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे दिसताच पोलिसांनी हस्तक्षेप करून त्यांची सुटका केली.

मारहाणीदरम्यान किशोर हे 'सनातन धर्म की जय' अशा घोषणा देत होते आणि मारहाण करणाऱ्या वकिलांना शिवीगाळही करत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या प्रकरणामुळे कोर्ट परिसरात काही वेळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी झालेल्या सुनावणीदरम्यान किशोर यांनी माजी सरन्यायाधीश गवई यांच्यावर बूट फेकला होता. त्यावेळी गवई यांनी मोठेपणा दाखवत त्यांना माफ केले होते. मात्र, या प्रकाराचा संताप काही वकिलांनी कोर्टात व्यक्त करत किशोर यांना चोप दिला.

पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणत पुढील कारवाई सुरू केली आहे.

## आयपीएल लिलाव १६ डिसेंबरला; स्मिथडी कॉकसह ३५० खेळाडूंवर बोली

**मुंबई।रयत समाचार**

इंडियन प्रीमियर लीग २०२६ च्या लिलावाची अंतिम यादी जाहीर झाली असून यंदा एकूण ३५० खेळाडूंवर बोली लागणार आहे. अबुधाबी येथे १६ डिसेंबर रोजी होणाऱ्या या लिलावासाठी २४० भारतीय आणि ११० विदेशी खेळाडू पात्र ठरले आहेत. सुरुवातीला १३९० खेळाडूंनी नोंदणी केली होती, त्यापैकी निवड करून अंतिम सूची तयार करण्यात आली.



अलीकडेच वनडेमधून निवृत्तीनंतर पुन्हा मैदानात परतलेल्या क्विंटन डी कॉक, तसेच अनुभवी ऑस्ट्रेलियन फलंदाज स्टीव्ह स्मिथ या यादीत असून त्यांच्याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पहिल्या सेटमध्ये भारताचा पृथ्वी शॉ आणि मुंबईचा सरफराज खान यांचा समावेश असून दोघांची मूळ किंमत ७५ लाख ठेवण्यात आली आहे. कॅमरन ग्रीन, डेव्हॉन कॉनवे आणि डेव्हिड मिलर या दिग्गजांची बेस प्राईस २ कोटी आहे. फ्रँचायझींपैकी कोलकाता नाईट रायडर्सकडे सर्वाधिक ६४.३ कोटी, तर चेन्नई सुपर किंग्सकडे ४३.४ कोटी रक्कम उरली आहे. इंग्लंडचे २१, ऑस्ट्रेलियाचे १९, दक्षिण आफ्रिकेचे १५, श्रीलंकेचे १२, न्यूझीलंडचे १६ आणि अफगाणिस्तानचे १० खेळाडू अंतिम यादीत आहेत. रचिन रवींद्र, रहमानुल्लाह गुरबाज, लुंगी एनगिडी, एनरिख नॉर्किया, वानिंदू हसरंगा यांसारखे स्टार खेळाडूही लिलावात दिसणार आहेत.

यंदाच्या लिलावात एकूण ७७ जागांसाठी स्पर्धा असून कोणत्या खेळाडूवर मोठी बोली लागते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## दक्षिण महाराष्ट्राचा अभिमान
## चित्रकार अनिल दबडे यांचे दोन विश्वविक्रम

**सांगली गुरुदत्त वाकदेकर**

प्रसिद्ध चित्रकार अनिल दबडे यांच्या नावावर एकाचवेळी दोन विश्वविक्रम नोंदविले गेले आहेत. लंडन बुक ऑफ रेकॉर्ड आणि इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड या दोन्ही विक्रमांत त्यांची नोंद झाली आहे. दबडे यांनी जुन्या पन्नास रुपयांच्या नोटेचे मूळ आकारात जलरंगात अत्यंत बारकाईने आणि हुबेहूब चित्र रेखाटले आहे. नोटेतील सर्व तपशील, रंगसंगती, अशोकस्तंभ आणि सर्व भाषांतील अक्षरे अचूक रेखाटली असून गव्हर्नरची सही त्यांनी मुद्दाम वगळली आहे. एकाच बाजूचे ही प्रतीकृती जशीच्या तशी रेखाटत त्यांनी हा कौशल्यपूर्ण विक्रम साध्य केला. या विश्वविक्रमासाठी गोव्याच्या बिग फूट संग्रहालयाचे महेंद्र अल्वारिया, गुजरातचे मुख्य संपादक पवन तसेच लंडन बुक ऑफ न्यू रेकॉर्डचे भारतातील प्रमुख डॉ. अविनाश सकुड यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. या विक्रमासाठी दबडेंचे अनेक दिवसांचे प्रयत्न फलदायी ठरले. ''भारताचे आणि महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली, ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे,'' असे दबडे यांनी सांगितले. अनिल दबडे यांनी जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मधून टेक्स्टाईल डिझाईनची पदवी संपादन केली आहे. शर्ट, पँट, काश्मिरी शाल यांसारख्या वस्त्रांच्या



जलरंगातील डिझाईन्स तयार करताना वस्त्रनिर्मितीतील सूक्ष्म तपशील रेखाटण्याची कला त्यांनी आत्मसात केली. मिनिएचर पेंटिंगचेही त्यांनी कार्य केले असून, या बारीकसारीक तपशील टिपण्याच्या कौशल्याचा मोठा उपयोग पन्नास रुपयांच्या नोटेचे चित्रण करताना झाला, असे ते सांगतात. पूर्वी ते ज्युबिली कन्या शाळेत कला शिक्षक म्हणून कार्यरत होते. उद्योगपती, चित्रपटसृष्टीतील मान्यवर आणि अनेक नेत्यांकडेही दबडे यांची चित्रे पाहायला मिळतात. त्यांच्या विद्यार्थ्यांनी चित्रकलेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. इतरांना शिकवताना त्यांनी स्वतः चार पदव्या प्राप्त केल्या आहेत. त्यांना शंभरहून अधिक पुरस्कार आणि सन्मानचिन्हे प्राप्त झाली आहेत. त्यांच्या कलाकृतींचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे हात न उचलता एकाच रेषेत गणपती तसेच इतर पोर्ट्रेट्स रेखाटण्याचे अनोखे कौशल्य, ज्याचे सर्वत्र कौतुक होते.

दबडे यांची चित्रकलेवरील ५० पुस्तके प्रकाशित झाली असून, त्यांच्या पन्नासाव्या पुस्तकाचे प्रकाशन पॅरिस येथील आयफेल टॉवरमध्ये करण्यात आले आहे. त्यांनी भारतभर भ्रमंती केली असून २५ देशांचा प्रवास केला आहे. अनेक देशांत त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन झाले आहे. दक्षिण आफ्रिका, ब्राझील आणि सिशेल्स येथील ग्रंथालयांत त्यांच्या पुस्तकांचा समावेश आहे. शासनाच्या एलिमेंटरी आणि इंटरमिजिएट परीक्षासाठी त्यांची पुस्तके बेस्ट सेलर ठरली आहेत. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी १०० यूट्यूब व्हिडिओ तयार केले असून त्यांना हजारो फॉलोअर्स आहेत.

## तुकाराम मुंढेंवरून सभागृहात खडाजंगी; दबावाखाली कारवाई नको- वडेट्टीवार

**नागपूर । रयत समाचार**

हिवाळी अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या संदर्भातील लक्षवेधीवरून विधानसभेत तीव्र खडाजंगी पाहायला मिळाली. भाजप आमदार कृष्णा खोपडे यांनी सभागृहात उभे राहून, ''तुकाराम मुंढेंच्या समर्थकांकडून मला बघून घेऊ अशा धमक्या मिळाल्या आहेत,'' असा गंभीर आरोप केला. स्मार्ट सिटी प्रकल्पाचा अतिरिक्त पदभार चुकीच्या पद्धतीने स्वतःकडे ठेवल्याबाबत आपण दिलेल्या लक्षवेधीमुळे ही धमकी आल्याचे त्यांनी सांगितले.



खोपडे यांच्यासोबतच भाजपचे आणखी एक आमदार प्रवीण दटके यांनीही मुंढेंविरुद्ध सभागृहात तक्रार नोंदवली. २० ऑक्टोबर २०२५ रोजी शासनाकडून आलेल्या पत्राचा उल्लेख करत दटके यांनी, स्मार्ट सिटी नियुक्ती प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच, प्रसूतीनंतर सुट्टीवर असलेल्या महिला कर्मचाऱ्यांचे अर्ज रद्द केल्याचा, तसेच एका महिला कर्मचाऱ्याशी अवमानकारक वागणूक केल्याचा आरोपही त्यांनी केला.

या आरोपांदरम्यान काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी तुकाराम मुंढेंचा ठाम पणे बचाव केला. ''मुंढे प्रामाणिक आणि इमानदार अधिकारी आहेत. नागपूर महापालिकेने त्यांना क्लीन चीट दिली आहे. महिला आयोगानेही त्यांच्या विरोधातील तक्रार फेटाळून तक्रारदार महिलेलाच दंड केला आहे,'' असे वडेट्टीवार म्हणाले.

त्यांनी पुढे मुख्यमंत्र्यांना आवाहन केले की, ''या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी. चूक असेल तर कारवाई करावी; पण अधिकारी निर्दोष असतील तर कोणत्याही राजकीय दबावाखाली शिक्षा होऊ नये.'' त्याचवेळी वडेट्टीवार यांनी धमकीचे आरोप गंभीर असल्याचे सांगत, आमदार खोपडे यांना धमकी देणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली.

## स्थानिक निवडणुकांच्या बातम्यांतील 'चूक' थांबवा
### प्रसारमाध्यमांना कडक सूचना

**मुंबई । रयत समाचार**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत काही वृत्तवाहिन्या आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित करण्यात येणाऱ्या बातम्यांमध्ये भारत निवडणूक आयोगाची चिन्हे, इमारती किंवा मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या (सीईसी) छायाचित्रांचा वापर आढळून येत असल्याची नोंद घेऊन महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी प्रसारमाध्यमांना स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या कार्यालयाकडून जारी केलेल्या दिशानिर्देशांनुसार, संसदीय, विधानमंडळ, राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणुका घेण्याची जबाबदारी भारत निवडणूक आयोगाची (ईसीआय) असते. राज्यात या कामकाजाचे समन्वय करण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी नियुक्त केले जातात.

तर दुसरीकडे, संविधानातील अनुच्छेद २४३के व २४३झेडए नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे अधीक्षण आणि नियंत्रण ही जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची (एसईसी) असते. महाराष्ट्रात निवृत्त प्रधान सचिव दिनेश वाघमारे हे सध्या राज्य निवडणूक आयुक्त म्हणून कार्यरत आहेत.

या दोन आयोगांचे कार्यकक्षा पूर्णपणे स्वतंत्र असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरील बातम्यांमध्ये भारत निवडणूक आयोगाचे बोधचिन्ह, इमारती, अधिकारी किंवा तत्सम दृश्यांचा वापर करणे चुकीचे आणि दिशाभूल करणारे असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने स्पष्ट केले आहे.

तसेच अशा चुकांची नोंद झाल्यास संबंधित माध्यमांनी तातडीने दुरुस्ती करून चुकीचे व्हिडिओ किंवा ग्राफिक्स सोशल मीडियातून हटवावेत, असे आवाहनही मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून करण्यात आले आहे.मुख्य अधिकाऱ्यांचे मत स्पष्ट आहे की, स्थानिक निवडणुकांबाबत बातमी देताना योग्य आयोगाचे संदर्भ, चिन्हे आणि दृश्य वापरून जनतेपर्यंत अचूक माहिती पोहोचवणे ही प्रसारमाध्यमांची जबाबदारी आहे.

## आर्थिक आकडेवारी; 'स्थूला'तून 'सूक्ष्मा'त नेण्याची गरज आहे!

**अर्थवार्ता । संजीव चांदोरकर**

**सत्ताधारी पक्ष आमच्या कार्यकाळात अर्थव्यवस्था कशी प्रगती करत आहे हे सतत सिद्ध करत राहतात. त्यासाठी स्थूल अर्थव्यवस्थेची (मॅक्रो इकॉनॉमी) आकडेवारी वापरतात. खरा गेम तर सूक्ष्मात असतो.**

**स्थूल आकडेवारी शिजवलेली असते असे नाही. पण त्या स्थूल आर्थिक आकडेवारीला सूक्ष्मात नेण्याची गरज असते. जे काम खरेतर मेनस्ट्रीम मीडिया आणि स्वतःला अर्थतज्ञ म्हणवणाऱ्यांचे आहे. जे काम ते करत नाहीत. कारणे आपल्याला माहित आहेतच.**

देशाची तिमाही जीडीपी ८.२ टक्के झाली. सर्व जगात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. छानच आहे हे पण भारताच्या दरडोई जीडीपी वाढीचा ग्रोथ रेट किती? हंगर इंडेक्स वाढण्याचा, खालवण्याचा रेट किती आहे? ऑक्सफॅम, गिनी निर्देशांक वाढण्याचा ग्रोथ रेट किती आहे? हे सूक्ष्मातले प्रश्न विचारावयास हवेत की नको?

देशाचे मासिक जीएसटी, म्हणजे अप्रत्यक्ष कराचे, संकलन दोन लाख कोटी झाले आहे. छानच आहे हे. आयकर तूर्तास बाजूला ठेवूया. पण प्रॉपर्टी, इन्हेरीटन्स, वेल्थ, सट्टेबाजीवर, टोबीन टॅक्स अशा प्रत्यक्ष करांचे प्रस्ताव का नाही आणत? कोणीही मागणी केलेली नसताना कॉर्पोरेट इनकम टॅक्स का कमी केला? श्रीमंत राष्ट्रांचा टॅक्स, जीडीपी रेशो ३५ टक्के आणि ज्याला वित्तीय स्त्रोतांची गरज आहे अशा भारताचा १८ टक्के का? हे सूक्ष्मातले प्रश्न विचारावयास हवेत की नको?

शेती क्षेत्रासाठी अर्थसंकल्पात किती तरतूद केली? किसान सन्मान मधून किती कोटी रुपये वाटले? फाईन पण शेती क्षेत्राचा देशाच्या जीडीपी मध्ये वाटा किती वाढला? शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी झाल्या का वाढल्या? शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढला की कमी झाला? हे सूक्ष्मातील प्रश्न विचारायला हवेत.मुद्रा योजना, मायक्रो लोन्स खूप वेगाने वाढत आहेत ; म्हणजे त्यांना असे म्हणायचे असते कि दारिद्र्य निर्मूलन जोरात सुरु आहे. फाईन पण या कर्जाचा विनियोग स्वयंरोजगारासाठी, स्वतःचा उद्योग धंदा, उत्पन्नाची साधने उभी करण्यासाठी होत असेल तर या कुटुंबांची उत्पन्ने वाढून कर्जाचा बोजा कमी झाला पाहिजे; पण मग या वर्गात कर्जबाजारीपणा कसा वाढत आहे? हे सूक्ष्मातले प्रश्न विचारावयास हवेत की नको?

देशातील वाहन उद्योग वधारत आहे, दुचाकी कार्सची विक्री वाढत आहे; फाईन पण विविध म्युन्सिपल बजेट मध्ये सार्वजनिक वाहतूक बजेट किती वाढले ? राज्यांच्या राज्य परिवहन मंडळाचे बजेट किती वाढले? केंद्र, राज्य सरकारांनी किती मदत केली ? किती नवीन बसेस रस्त्यावर आल्या? हे सूक्ष्मातले प्रश्न विचारावयास हवेत की नको?

देशातील रियल इस्टेट क्षेत्रात तेजी आहे, विक्रीचे आकडे वाढत आहेत. यात देशातील महानगरांमधील मोठ्या आकाराच्या अपार्टमेंट्स, व्हिलाची ज्यांची किंमत काही कोटी रुपये आहे त्यांचा हिस्सा किती? ज्यांना सरकार अफोर्डेबल हौसिंग म्हणते त्या एका घराची किंमत लाखात कि कोटींमध्ये? समजा असे घर कर्ज काढून गरिबांनी घेतलेच तर ईएमआय किती बसणार? त्याचा गरिबांच्या सरासरी मासिक, उत्पन्नाशी काही ताळमेळ असेल का? हे सूक्ष्मातले प्रश्न विचारावयास हवेत की नको?

दोस्तांनो,

वर लावलेल्या सर्व जोड्या सार्वजनिक रित्या उपलब्ध असणाऱ्या माहितीवर आधारित आहेत; त्यात एका पैशाचे नावीन्य नाही इकॉनॉमी, बँकिंग हे विषय सामान्य नागरिकांच्या आकलनाच्या बाहेरचे आहेत; ते फक्त अर्थशास्त्रात पीएचडी केलेल्यांना कळतात असे तुमच्या मनावर ठरवून बिंबवले गेले आहे

**कॉमन सेन्सवर आधारित प्रश्न तर विचारा? फक्त प्रामाणिक निरीक्षणे हवीत आणि कोट्यवधी लोकांच्या प्रति सहसंवेदना हवी; आणि अर्थात न्यूनगंडावर मात करणारा आत्मविश्वास हवा.**

## १४ वर्षांत सरकारी कर्जात तब्बल पाचपट वाढ
### देशाचे कर्ज चिंतेचा विषय

**नवी दिल्ली । रयत समाचार**

केंद्र सरकारच्या अधिकृत आकडेवारीनुसार, देशाच्या एकूण कर्जामध्ये गेल्या १४ वर्षांत अभूतपूर्व वाढ झाल्याचे स्पष्ट होत आहे. वर्ष २०१० मध्ये भारत सरकारवर एकूण ₹३५ लाख कोटींचे कर्ज होते. मात्र, आर्थिक तज्ज्ञांनी व्यक्त केलेल्या अंदाजानुसार वर्ष २०२४ पर्यंत हेच कर्ज तब्बल ₹१७२ लाख कोटींवर पोहोचले आहे.

ही वाढ जवळपास पाचपट असल्याने देशाच्या आर्थिक शिस्तीवर आणि भविष्यातील वित्तीय धोरणांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

अर्थतज्ज्ञांच्या मते, पायाभूत सुविधांवरील गुंतवणूक, सामाजिक योजनांचे वाढते भार, तसेच कोविडनंतरची आर्थिक पुनर्बांधणी ही कर्जवाढीमागील प्रमुख कारणे असल्याचे सांगितले जाते. मात्र, इतक्या मोठ्या प्रमाणातील कर्जामुळे महसूल तूट, व्याजभार वाढ आणि पुढील पिढ्यांवर पडणारा आर्थिक ताण या मुद्द्यांवर चर्चा गरजेची ठरत आहे.

कर्जाचा आकडा झपाट्याने वाढत असताना सरकारची वित्तीय जबाबदारी, वाढीचा वेग आणि अर्थव्यवस्थेतील स्थिरता यावर सर्वसामान्य नागरिकांनाही चिंता व्यक्त करावी लागत आहे.

आपल्या मते, देशाच्या वाढत्या कर्जाचे खरे कारण काय? आणि यावर उपाय काय असावा?

## बाबा आढावांच्या निधनाने समाजकार्य क्षेत्रात शोककळा
### मनसेप्रमुख राज ठाकरेंची भावनिक पोस्ट

मुंबई । रयत समाचार

ज्येष्ठ समाजसेवक आणि कामगार चळवळींचे प्रणेते बाबा आढाव यांचे सोमवारी (८ डिसेंबर) वयाच्या ९५व्या वर्षी निधन झाले. गेल्या काही महिन्यांपासून प्रकृती खालावल्याने त्यांच्यावर पुण्यातील एका रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने कष्टकरी, असंघटित कामगार आणि सामाजिक चळवळींना अपरिमित अशी हानी झाली असल्याची भावना राज्यभर व्यक्त होत आहे. कागदवेचक, रिक्षाचालक, सफाई कर्मचाऱ्यांसह असंघटित कामगारांच्या प्रश्नांसाठी आयुष्य वेचणारे बाबा आढाव यांनी 'एक गाव एक पाणवठा' चळवळ, रिक्षा व हमाल पंचायत तसेच माथाडी कामगार कायद्यासाठी महत्त्वाची लढाई उभारली. त्यांच्या निधनानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भावनिक पोस्टद्वारे श्रद्धांजली अर्पण केली. ''डॉक्टरकीचा व्यवसाय सोडून समाजकारणासाठी आयुष्य अर्पण करणारी माणसं हल्ली तयार होताना दिसत नाहीत. बाबा आढावांसारखी माणसं पुन्हा घडावीत, हीच इच्छा,'' असे राज ठाकरे यांनी म्हटले. तसेच, आजच्या उदारीकरणाच्या काळात कामगारांचे शोषण वाढत असून अशा परिस्थितीत आढाव यांचे कार्य अधिक महत्त्वाचे ठरते, असेही त्यांनी नमूद केले. राज ठाकरे यांनी आठवण करून दिली की, वयाच्या ९५व्या वर्षीही आढाव यांनी ईव्हीएमविरोधात आंदोलन करत समाजकारणातील तडफ दाखवली होती.

## महापरिनिर्वाणदिन
### आदिवासी आश्रमशाळेत अन्नदान



**ठाणे गुरुदत्त वाकदेकर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आणि लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या स्मृती दिनानिमित्त विठ्ठल उमप फाउंडेशन तर्फे आदिवासी मुलामुलींच्या आश्रमशाळेत अन्नदान कार्यक्रम संपन्न झाला. सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी आणि वंचित विद्यार्थ्यांच्या पोषणासाठी आयोजित हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रम बाबरेवाडीतील आदिवासी कातकरी मुलांमुलींच्या आश्रमशाळेत घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि समाधान दिसून आले. ग्रामीण व आदिवासी समाजातील मुलांच्या शिक्षणप्रवासाला हातभार लावणे आणि पोषणाची काळजी घेणे या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक अध्यक्ष शाहीर नंदेश विठ्ठल उमप होते, तर सदस्य म्हणून सरिता नंदेश उमप, सचिन चिरगुटकर आणि सुमेध यांनी सहभाग नोंदवला. फाउंडेशनच्या सर्व सदस्यांच्या प्रयत्नांमुळे अन्नदान उपक्रम यशस्वी आणि सुरळीत पार पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समतेच्या तत्त्वज्ञानाची आणि लोकशाहीर विठ्ठल उमप यांच्या सामाजिक कार्याची आठवण करून देणाऱ्या या उपक्रमातून प्रेम, सहकार्य आणि सेवाभावाचा संदेश समाजापर्यंत पोहोचवला गेला. विठ्ठल उमप फाउंडेशनच्या सातत्यपूर्ण कार्याची ही नोंद प्रेरणादायी ठरली.

# साई स्कूलचा स्काऊटगाईड कॅम्प अंतरवली येथे उत्साहात

**अहमदनगर । रयत समाचार**

श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा स्काऊटगाईड कॅम्प अंतरवली येथे ता. ६ व ७ डिसेंबर रोजी उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. दोन दिवस चाललेल्या या कॅम्पचे उद्घाटन नेवासा तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते अब्दुल शेख, तस्मैया शेख, संजय चव्हाण, स्काऊटगाईड मार्गदर्शक विकास लोखंडे, संस्थेचे अध्यक्ष अशोक कानडे, सचिव सुनिता कानडे, प्राचार्या शितल गायकवाड, एज्युकेशन डायरेक्टर तनुजा लोंढे, क्रीडा शिक्षक प्रसाद पाटोळे, संजय गायकवाड, मंदा तायडे, ज्येष्ठ शिक्षिका स्नेहल महाजन, प्रज्ञा भागवत तसेच शिक्षक व पालक यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.




मुख्य पाहुणे अब्दुल शेख म्हणाले की, अशा स्काऊटगाईड उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास व जबाबदारीची जाणीव दृढ होते. शालेय कॅम्पच्या माध्यमातून विद्यार्थी सामाजिक जबाबदारीकडे व व्यक्तिमत्व विकासाकडे वळतात, असे त्यांनी सांगितले.

यावेळी संजय चव्हाण यांनी विनोदानिशी विद्यार्थ्यांना सामाजिक भान विकसित करणारे मार्गदर्शन केले. त्यांच्या संवादशैलीने विद्यार्थी मंत्रमुग्ध झाले.

कॅम्पदरम्यान विद्यार्थ्यांनी साहसी खेळ, तंबू बांधणी, प्राथमिक उपचार प्रशिक्षण, शिस्तबद्ध संचलन आणि टीमवर्क वाढवणारे उपक्रम यामध्ये सक्रिय सहभाग घेतला. रात्रीच्या शिबिरात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून आपली कला आणि कल्पकता सादर केली.

तसेच विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान आणि पर्यावरण संवर्धनाचे संदेश देणारे उपक्रम राबवले.

# ‘गुलदस्ता’चे पहिले कवी संमेलन उत्साहात; नवोदित कवींना मिळाले हक्काचे व्यासपीठ

**अहमदनगर । रयत समाचार**

गुलदस्ता ग्रुपच्या वतीने सावेडी येथील ‘आधार आपुलकी फाउंडेशन’ येथे कवी आणि नवोदित कवींसाठी पहिल्या कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. शहरातील तसेच शहराबाहेरील कवींनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या मनोगतांची, कवितांची मुक्त सादरीकरणे केली. आनंद, उत्साह आणि खेळीमेळीच्या वातावरणात हे संमेलन यशस्वीरीत्या पार पडले.



‘‘जेव्हा शब्द एकत्र येतात तेव्हा कविता जन्म घेते आणि जेव्हा कवी एकत्र येतात तेव्हा संस्कृती उजळते,’’ असे मत संयोजकांनी व्यक्त केले. साहित्यसंस्कृतीचा वारसा जपण्याचे कार्य गुलदस्ता ग्रुपच्या वतीने या कवी संमेलनातून होत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमास संजय झिंजे, निवृत्त मनपा अधिकारी मिलिंद वैद्य, आपुलकी फाउंडेशनचे हेमंत लोहगावकर, आयोजक रवी डी’क्रूझ, निखिल कुलकर्णी, रिजवान शेख, सईद शेख, रियाज पठाण यांच्यासह शहरातील आणि शहराबाहेरील अनेक कवी उपस्थित होते.

गुलदस्ता ग्रुपने आम्हाला हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले असून, या माध्यमातून मोठी संधी मिळाल्याचा आनंद नवोदित कवींनी व्यक्त केला. ‘‘या संधीचे आम्ही सोनं करू; कवितेच्या माध्यमातून आपल्या अहिल्यानगर शहराचा नावलौकिक राज्यभरात करू,’’ अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

संमेलनाचे सूत्रसंचालन रिजवान शेख यांनी केले, तर आभार निखिल कुलकर्णी यांनी मानले.

## जेऊर गणातून स्वाती कोथिंबिरे तयारीत

**नगर तालुका । नवनाथ मगर**

जेऊर गणातील माजी सरपंच विकास कोथिंबिरे यांच्या सुनबाई स्वाती मनोज कोथिंबीर यांचे नाव पंचायत समिती सदस्यपदाच्या उमेदवारीसाठी सर्वाधिक चर्चेत आहे. आमदार शिवाजी कर्डिले यांच्याशी असलेली जवळीक आणि विश्वासू कार्यकर्त्या म्हणून त्यांची ओळख लक्षात घेता, त्यांच्या उमेदवारीची शक्यता अधिक मानली जात आहे. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विकास कोथिंबिरे यांनी केलेल्या कामांची पंचक्रोशीत दखल घेतली जाते. ग्रामीण विकासाबाबत कोथिंबीरे परिवाराची सकारात्मक भूमिकाही सातत्याने पुढे येत असून, त्यामुळे जनतेत या परिवाराबद्दल चांगले वातावरण निर्माण झाले आहे. याशिवाय, मनोज विकास कोथिंबीर यांचा तरुणांमध्ये असलेला मजबूत मित्रपरिवार आगामी निवडणुकीत निर्णायक ठरण्याची चर्चा स्थानिक पातळीवर आहे. त्यामुळे स्वाती मनोज कोथिंबीरे लोकप्रिय, सक्षम व प्रभावी जनसंपर्क ठेवणाऱ्या उमेदवार म्हणून पुढे येत असून, त्यांच्या उमेदवारीकडे सर्वांचे लक्ष लागले.



# वरिष्ठ कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे उपोषण

**अहमदनगर । रयत समाचार**

समग्र शिक्षा संघर्ष समितीने यशवंत स्टेडियम, नागपूर येथे सोमवार ता. ८ डिसेंबर रोजी पासून सुरू केलेल्या बेमुदत आमरण उपोषणाची तात्काळ दखल घेण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने शासनाकडे केली आहे. या संदर्भातील निवेदन शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व माजी आमदार नागो गाणार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे आणि शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांना पाठविल्याची माहिती जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली. समग्र शिक्षेअंतर्गत मागील दोन दशकांपासून विविध संवर्गात करार तत्त्वावर सेवा बजावणारे तब्बल ६,४८३ उच्चशिक्षित कर्मचारी कार्यरत आहेत. शासन निर्णय ता. ८ ऑक्टोबर २०२४रोजीनुसार यापैकी ३,१०५ कनिष्ठ कर्मचाऱ्यांचे समायोजन कायम स्वरुपी शासन सेवेत करण्यात आले आहे. मात्र ३,३७८ वरिष्ठ कर्मचारी अद्याप समायोजनापासून वंचित असल्याने असंतोष वाढत आहे. शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि. ४ जून २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये वरिष्ठ कर्मचाऱ्यांच्या समायोजनासाठी अभ्यास समिती गठित केली होती. या समितीने शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता लक्षात घेऊन शालेय शिक्षण, ग्रामविकास आणि इतर विभागांतील समकक्ष रिक्त पदांची सविस्तर समीक्षा करून अहवाल शासनाकडे सादर केला. मात्र या अहवालाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेला शासन निर्णय अद्याप निर्गमित न झाल्याने वरिष्ठ कर्मचाऱ्यांचे समायोजन अनिश्चिततेत आहे.



या न्याय्य मागण्यांसाठी ८ डिसेंबरपासून नागपूर येथील यशवंत स्टेडियममध्ये बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद या आंदोलनाला संपूर्ण पाठिंबा देत आहे.

## आंतरराष्ट्रीय संगीत परीक्षेत दक्ष कुलकर्णी प्रथम

**अहमदनगर । आबीद खान**

लंडन येथील ट्रिनिटी कॉलेजच्या वतीने घेण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक की-बोर्ड ग्रेड आंतरराष्ट्रीय संगीत परीक्षेत ग्रेस म्युझिक ॲकॅडमीचा विद्यार्थी दक्ष मंगेश कुलकर्णी याने १०० पैकी १०० गुण मिळवत उल्लेखनीय यशाची नोंद केली आहे.जगभरातील लाखो परीक्षार्थींनी सहभाग घेतलेल्या या प्रतिष्ठित परीक्षेत नगर जिल्ह्यातून एकूण ३२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यामध्ये दक्ष कुलकर्णीने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत आपली संगीत प्रतिभा सिद्ध केली. ही परीक्षा सात वर्षांवरील विद्यार्थ्यांसाठी खुली असते. या परीक्षेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी ९८९०९७८९९७ / ९५११२२४७९४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे ग्रेस म्युझिक ॲकॅडमीचे मार्गदर्शक पिटर पंडीत व सोनाली पिटर पंडीत यांनी आवाहन केले.


**दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक**
**गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे**

**ख्रिसमस विशेषांक**

**अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात**

अतिथी संपादक
**सॅम्युअल वाघमारे**
8788412780

संपादक
**भैरवनाथ वाकळे**
8805401800

**रयत समाचार** महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक

**जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक**

भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४


# किशोरवयीन मुलींनी शारीरिक, मानसिक आरोग्याकडे लक्ष द्यावे- रोकडे

**अहमदनगर । रयत समाचार**

किशोरवयीन मुलींनी शारीरिक तसेच मानसिक आरोग्याबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. तणाव, चिंता, नैराश्य यांसारख्या समस्यांवर मात करण्यासाठी सकारात्मक दृष्टीकोन, संतुलित आहार, नियमित व्यायाम, योग आणि वेळेवर वैद्यकीय सल्ला महत्त्वाचा असल्याचे प्रतिपादन महर्षी ग. ज. चितांबर कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विभावरी रोकडे यांनी केले. जिल्हा क्रीडा कार्यालय, मेरा युवा भारत, मोगा शॉपी व जय युवा अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयात किशोरवयीन मुलींसाठी मोफत आरोग्य मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी आरोग्य सल्लागार हेमलता कांबळे, जय युवा अकॅडमीचे संचालक ॲड. महेश शिंदे, माहेर संस्थेच्या रजनीताई ताठे, समग्र परिवर्तनचे बाळासाहेब पाटोळे, समिद्रा पाटोळे, शिवगामिनी संस्थेच्या ॲड. गायत्री गुंड, जय युवाच्या कल्याणी गाडळकर, आरती रासकर, जयश्री शिंदे, प्रगती फाउंडेशनच्या अश्विनी वाघ, समृद्धी संस्थेच्या स्वाती डोमकावळे, उडान फाउंडेशनच्या आरती शिंदे, भाऊसाहेब पादीर, मनीषा शिंदे आदी उपस्थित होते. आरोग्य सल्लागार कांबळे म्हणाल्या की, दैनंदिन जीवनात मिळणाऱ्या अन्नधान्यातील रासायनिक प्रक्रिया, व्यायामाचा अभाव आणि मोबाईलचा वाढता वापर यामुळे हार्मोन्समध्ये बिघाड होऊन मुली अनेक आजारांना बळी पडत आहेत. बाजारातील प्लास्टिकयुक्त सॅनेटरी पॅडमध्ये रासायनिक घटक असल्याने गंभीर आजारांची शक्यता वाढते. त्यामुळे नैसर्गिक व आयुर्वेदिक सॅनेटरी नॅपकिनचा वापर करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी सॅनिटरी नॅपकिनच्या योग्य वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सूत्रसंचालन गणेश उघडे यांनी तर आभार ॲड. गायत्री गुंड यांनी मानले. कार्यशाळेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, भाऊराव वीर, प्रवीण कोंढावळे, प्रियंका खिंडरे, माय भारतचे जिल्हा समन्वय अधिकारी सत्यजित संतोष, मोहन गायकवाड, डॉ. ईसा शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

# विद्यार्थ्यांनी भाषणातून उभा केला बाबासाहेबांचा संघर्ष

## महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन

**नगर तालुका । रयत समाचार**

निमगाव वाघा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त नवनाथ विद्यालय, स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने अभिवादन कार्यक्रम पार पडला. प्रारंभी शालेय परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली.



डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेस उपशिक्षिका मंदा साळवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, संस्था अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्यासह शिक्षक, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनकार्य, सामाजिक संघर्ष, संविधाननिर्मितीतील योगदान आणि महापरिनिर्वाण दिनाचे महत्त्व यावर प्रभावी भाषणे सादर केली. भाषणांना उपस्थितांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, डॉ. आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे संघर्ष, प्रबोधन आणि परिवर्तनाची प्रेरणा. शिक्षण, समानता आणि बंधुभावासाठी त्यांनी आजीवन लढा दिला. त्यांच्या विचारांवर आजची पिढी चालली तर समाजातील अन्याय आणि भेदभाव नाहीसे होतील, असे त्यांनी सांगितले.

मंदा साळवे यांनी विद्यार्थ्यांना आंबेडकरांच्या शिक्षणप्रेमाची व समानतेच्या ध्येयाची ओळख करून देत प्रामाणिकता, शिस्त आणि मेहनत अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमासाठी नवनाथ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र शिंदे, शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब बुगे, युवा अधिकारी सत्यजीत संतोष, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे आणि रमेश गाडगे यांचे मार्गदर्शन लाभले.


**रयत समाचार Classified छोटी जाहिरात**

**छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद**

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
**जगदंबा टी सेंटर**
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
**त्वरित नियुक्त करणे आहेत**
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
* पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

**सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा**


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# भविष्य घडविण्यात शाळेबरोबर पालकांचीही जबाबदारी महत्त्वाची- डॉ. अजीज शेख

## पॅव्हिलियन स्कूलतर्फे 'सिरतुन्नबी क्विझ' स्पर्धा

**संगमनेर । सलीमखान पठाण**

विद्यार्थ्यांनी स्पर्धेच्या युगात कठोर मेहनत, परिश्रम आणि सकारात्मक वृत्ती अंगीकारून अभ्यासाकडे लक्ष देऊन स्पर्धा परीक्षा देऊन देशसेवा करावी. मुलांचे भविष्य घडविण्यात शाळेबरोबरच पालकांचीही महत्त्वाची भूमिका असते; ही जबाबदारी पालकांनी दक्षतेने पार पाडावी, असे आवाहन धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अजीज शेख यांनी केले.



येथील पॅव्हिलियन पब्लिक स्कूलतर्फे आयोजित 'सिरतुन्नबी क्विझ स्पर्धा' पारितोषिक वितरण सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. एमपीएससी व यूपीएससीसारख्या मानाच्या परीक्षा देऊन अधिकारी होण्याचे स्वप्न विद्यार्थ्यांनी बाळगावे आणि देशसेवा करण्याचा निर्धार ठेवावा, असा सल्लाही त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगमनेर अँग्लो उर्दू हायस्कूलचे चेअरमन शेख गनी हाजी होते. प्रमुख पाहुण्या म्हणून मुंबई पोलीस दलाच्या एसीपी शबाना शेख, मौलाना आझाद कॉलेज, औरंगाबादचे प्राचार्य वाजिदअली खान, अंजुमन-ए-इस्लाम ट्रस्ट संगमनेरचे अध्यक्ष अब्दुल्ला चौधरी, सचिव शौकतखान पठाण, संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. मोहसिन शेख, इंजिनिअर मुबीन शेख, सेक्रेटरी परवीन शेख, सादिया शेख, ज्येष्ठ पत्रकार सलीमखान पठाण, अल्मिझान संस्थेचे अध्यक्ष मोहमद रफीक शेख, डॉ. आयेशा, आर्किटेक्ट मदिहा शेख, शाळेचे समन्वयक प्रा. युसूफ पठाण, प्राचार्य मुनव्वर सर उपस्थित होते.

एसीपी शबाना शेख यांनी आपल्या मनोगतात मुलींनी जास्तीत जास्त शिक्षण घेऊन आयपीएसआयएएस सारख्या प्रतिष्ठित पदांवर पोहोचावे, असा प्रेरणादायी संदेश दिला. पोलीस अधिकाऱ्यापर्यंतचा आपला प्रवास त्यांनी विद्यार्थिनींसमोर प्रभावीपणे मांडला.

इस्लामिक स्कॉलर व माजी प्राध्यापक वाजिदअली खान यांनी "वाचाल तर वाचाल" या ओळींचा संदर्भ देत विद्यार्थ्यांना सातत्याने वाचनाचे महत्त्व पटवून दिले.

शाळेचे मुख्य प्रवर्तक व प्राचार्य अ‍ॅड. रज्जाक शेख यांनी शाळेत पुणे पॅटर्ननुसार शिक्षण देण्याची माहिती देत, गुणवंत विद्यार्थी घडविण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी आणि शिक्षक कठोर परिश्रम घेत असल्याचे सांगितले.

उपस्थित मान्यवरांमध्ये माजी उपनगराध्यक्ष शफी तांबोळी, आयाज सेठ इनामदार, अल्ताफ इनामदार, हाजी अन्सार बेग, अस्लम सय्यद, लोनच्या पीव्हीपी कॉलेजचे सुप्रिंटेंडट युनूस शेख, वकील, डॉक्टर, इंजिनिअर्स आणि विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांचा समावेश होता.

कार्यक्रमात विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपमुख्याध्यापिका परवीन शेख, प्रा. युसूफ खान, प्रशासकीय अधिकारी नेहा सय्यद, जुवेरिया पटेल तसेच शिक्षकशिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्राचार्य मुनव्वर शेख व मुफ्ती सलीम शेख यांनी तर आभार मौलाना अकिल यांनी मानले.

# गौरी शुगरचा दोन लाख मेट्रिक टन गाळपाचा टप्पा पार

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**



हिरडगाव येथे सुरू असलेल्या गौरी शुगर युनिटने चालू गाळप हंगामात दोन लाख मेट्रिक टन गाळपाचा टप्पा यशस्वीरीत्या पार केला. देवदैठण येथे सुरू असलेल्या या युनिटसाठी दहा लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या हंगामात ऊस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिटन ३१०० रुपये पहिला हप्ता देण्याची घोषणा ओंकार शुगर ग्रुपचे संस्थापक बाबुराव बोत्रे पाटील यांनी केली.

बोत्रे पाटील म्हणाले की, मागील वर्षी प्रतिटन ३१०६ रुपये दर देत दिवाळीच्या पार्श्वभूमीवर ऊसाच्या प्रमाणात मोफत साखरही देण्यात आली होती. या वर्षी साखर कामगारांना २० टक्के पगारवाढ देण्याचा निर्णय कंपनीने घेतला असून हा आर्थिक भार स्वखर्चाने उचलत शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करून यंदाच्या गळीत हंगामात प्रतिटन ३१०० रुपये पहिला हप्ता देण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावर्षीही दिवाळीनिमित्त १०० रुपये बोनस आणि ऊसाच्या प्रमाणात मोफत साखर शेतकऱ्यांना दिली जाणार आहे.

"कोण किती दर देतो किंवा एस दर किती असणार, याची स्पर्धा गौरी शुगर करत नाही. आमचे एकच धोरण शेतकऱ्यांच्या ऊसाला शक्य तितका जास्त दर देणे," असेही बोत्रे पाटील यांनी सांगितले.

जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी गौरी शुगरला ऊस द्यावा, असे आवाहन कार्यकारी संचालक रोहीदास यादव यांनी केले.

# जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात आरोग्य तपासणी शिबिर



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

जागतिक एड्स दिनानिमित्त महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज एनएसएस विभागाच्या संयुक्त विद्यमाने, ग्रामीण रुग्णालय श्रीगोंदा आणि हिंद लॅब श्रीगोंदा यांच्या सहयोगातून एक दिवसीय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांची हिमोग्लोबिन, थायरॉईड आणि कावीळ या तपासण्यांसह सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली. एकूण १५२ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली.

कार्यक्रमात एनईडीपी संस्थेच्या संगीता दराडे यांनी आपल्या अनुभवातून एड्सवर मात करताना आलेल्या अडचणी, समाजातील गैरसमज आणि एड्स रुग्णांविषयीची चुकीची धारणा याबाबत संवेदनशील मार्गदर्शन केले. कॉलेजचे पर्यवेक्षक रत्नाकर झीटे यांनी एचआयव्ही आणि एड्स यांमधील वैज्ञानिक फरक विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. अध्यक्षीय भाषणात कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांनी एड्स जनजागृतीची गरज आणि आरोग्य तपासणी शिबिरांचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी ज्युनिअर एनएसएस विभाग प्रमुख फटे, सीनियर एनएसएस विभाग प्रमुख प्रा. डॉ. भाऊसाहेब बुलाखे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामीण रुग्णालय श्रीगोंदा येथील समन्वयक अल्पना आमोलिक यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दरेकर यांनी, तर आभार प्रदर्शन फटे यांनी केले.

# दिव्यांगांनी स्वत:ची क्षमता ओळखावी- संजीवन दिवे



**श्रीरामपूर । रयत समाचार**

जागतिक दिव्यांग दिन सप्ताहानिमित्त मूकबधिर विद्यालय, श्रीरामपूर येथे आयोजित मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी पंचायत समिती श्रीरामपूरचे गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे यांनी दिव्यांगांनी स्वत:ची क्षमता ओळखून न्यूनगंडावर मात करण्याचे आवाहन केले.

जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण कार्यालय अहिल्यानगर, रोटरी मूकबधिर विद्यालय, अपंग सामाजिक विकास संस्था, आसान दिव्यांग संघटना, जिल्हा व्यवस्थापन समिती आणि अजित पवार मेडिकल कॉलेज वडाळा महादेव यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले.

फकार्यक्रमाला गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे, शिवा ट्रस्टचे संचालक दिलीप पवार, रोटरी एज्युकेशन ट्रस्टचे खजिनदार विनोद पाटणी, रोटरी क्लब सदस्य वैभव चुडीवाल व संजय साळवे यांची उपस्थिती होती.

शिवा ट्रस्टच्या वतीने दिव्यांगांसाठी आरोग्यविषयक उपक्रम भविष्यातही राबविण्यात येतील, असे संचालक दिलीप पवार यांनी सांगितले. कार्यक्रमात नव्याने नियुक्त गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे यांचा सत्कार करण्यात आला. संजय साळवे यांनी दिव्यांग कायदा २०१६ आणि त्यातील २१ प्रकारांबाबत मार्गदर्शन केले. रंगभरण, चित्रकला, १०० मीटर, ५० मीटर धावणे, गोळाफेक स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देण्यातआली. शिबिरामध्ये विद्यालयातील व तालुक्यातील दिव्यांगांची आरोग्य तपासणी करून आवश्यक उपचार करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय साळवे यांनी केले, तर आभार दीपक तरकासे यांनी मानले. कार्यक्रमासाठी विद्यालयातील व विविध संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले.

# मदनलाल अनेचा यांचे निधन

**नेवासा । रावसाहेब राशिनकर**



अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चांदा येथे अनेक वर्षे गणित विषयाचे अध्यापन करून विद्यार्थ्यांच्या घडणीत अमूल्य योगदान देणारे, सेवाभावी वृत्तीचे, शिस्तप्रिय आणि अष्टपैलू शिक्षक मदनलाल उमेदमल अनेचा यांच्या निधनाने चांदा परिसरात शोककळा पसरली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी त्यांनी आयुष्यभर परिश्रम घेतले. गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देत अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य त्यांनी सेवाभावाने केले. अनेचा यांचे निधन वृत्त समजताच चांदा व परिसरातील नागरिकांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी प्राचार्य अंशुमन वाकचौरे, उपप्राचार्य रघुनाथ भोजने, पर्यवेक्षक राजेश शेंडगे, समन्वयक प्रा. भाऊसाहेब तांबे, प्रसिध्दी विभाग प्रमुख प्रा. रावसाहेब राशिनकर, ज्येष्ठ शिक्षक अर्जून वैरागर तसेच सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, शालेय व्यवस्थापन समिती आणि माजी विद्यार्थी संघाच्या वतीने अनेचा यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# १० डिसेंबरला डॉ. बाबा आढाव अभिवादन सभा

**अहमदनगर । रयत समाचार**



अंगमेहनती कामगार-कष्टकऱ्यांचे आवाज बनलेल्या, 'एक गाव एक पाणवठा' चळवळीचे प्रणेते, शोषित-पीडितांच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढा देणारे ज्येष्ठ सत्यशोधक आणि प्रख्यात समाजवादी डॉ. बाबा आढाव यांना अभिवादन करण्यासाठी विशेष अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले आहे. ही सभा ता. १० डिसेंबर संध्या. ५ वा. हमाल पंचायत भवन, मार्केट यार्ड, नगर येथे आयोजित करण्यात आली. कामगार, हमाल, कष्टकरी कार्यकर्ते उपस्थित राहून अभिवादन करणार असल्याची माहिती हमाल पंचयातचे अध्यक्ष अविनाश घुले यांनी केले.

## किस्से निवडणुकीचे...

**सलीमखान पठाण**

### कमी मतदानाला निवडणूक आयोग जबाबदार?

श्रीरामपूर नगरपरिषदेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत अपेक्षेपेक्षा कमी मतदान झाल्याने नगराध्यक्षपदाच्या उमेदवारांसह प्रभागातील सर्वच उमेदवारांची धडधड वाढली आहे. साधारण ८० टक्क्यांपेक्षा जास्त मतदान होईल, अशी सामान्य अपेक्षा असताना शहरात केवळ ६७ टक्के मतदान झाले. दहा ते बारा टक्क्यांनी घटलेले हे मतदान साधारण १० हजार मतदारांच्या अनुपस्थितीइतके मानले जात आहे. मतदान अनपेक्षितरीत्या कमी का झाले, याबाबत शहरात वेगवेगळ्या चर्चा रंगल्या आहेत. काही मतदारांकडून "उमेदवारांकडून प्रसाद मिळेल आणि मग मतदानाला जाऊ" या अपेक्षेमुळे घरीच थांबण्याचा प्रकार घडल्याची चर्चा आहे; परिणामी मतदानाची वेळ निघून गेली. मात्र, सर्वात मोठा मुद्दा ठरला तो निवडणूक आयोगाने मतदार याद्यांमध्ये केलेला गोंधळ. विधानसभेची मतदान केंद्रे गृहीत धरून मतदार याद्या तयार करण्यात आल्या. एका प्रभागात अनेक मतदान केंद्रांचे मतदार असताना मतदार स्लीपवर खोल्या व क्रमांक नोंदविताना गंभीर चुका झाल्या. प्रत्येक खोलीसाठी मतदार क्रमांक १ पासूनच सुरू करण्यात आले. त्यामुळे सर्व खोल्यांतील मतदार क्रमांक सारखेच दिसत होते. यामुळे मतदारांना योग्य खोली मिळेपर्यंत अनेक खोल्यांत चकरा माराव्या लागल्या. काही ठिकाणी तर सर्व खोली फिरून आल्यावर मतदाराला सांगण्यात आले की, "तुमचे मतदान या शाळेत नसून दुसऱ्या शाळेत आहे." या दोन मतदान केंद्रांतील अंतर २ किमी पेक्षा जास्त असल्याने अनेक मतदारांनी संतापून मतदानास नकार दिला. काही प्रभागांमध्ये नावे इकडे-तिकडे झाल्याची अनेक उदाहरणेही दिसली. स्थानिक निवडणूक यंत्रणेकडून उत्तम नियोजन असूनही, मतदार याद्यांवरील त्रुटी मतदान प्रक्रियेला मोठा फटका ठरला. परिणामी मतदानाचे प्रमाण घटले आणि सर्वच उमेदवारांच्या समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आता कमी झालेल्या मतदानाचा फायदा कुणाला आणि तोटा कुणालायाचा नेमका निकाल २१ डिसेंबरला लागणार आहे. तोपर्यंत शहरातील गल्लीबोळात चर्चा, अंदाज आणि राजकीय गप्पांचे गुऱ्हाळ रंगतच आहे. सर्वसामान्य श्रीरामपूरकर मात्र हे गोंधळाचे वातावरण नाईलाजाने सहन करीत आहेत.

# जिल्हा रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र घोटाळा

## आ. ओगले यांनी वेधले शासनाचे लक्ष

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**



अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात दिव्यांग प्रमाणपत्र प्रणालीचा पासवर्ड व आयडी चोरून पन्नास हजार रुपयांमध्ये खोटे दिव्यांग प्रमाणपत्र वाटप केल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला आहे. खरे दिव्यांगांना डावलून अपात्र व्यक्तींना प्रमाणपत्रे देण्यात आल्याच्या या गंभीर घोटाळ्याचा मुद्दा आमदार हेमंत ओगले यांनी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात उपस्थित केला.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी आमदार हेमंत ओगले यांनी अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन करा या मागणीचे प्रतीक म्हणून गांधी टोपी परिधान करून विधानभवनात प्रवेश केला. त्यांच्या या अनोख्या पद्धतीमुळे सभागृहातील सर्वांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले गेले.

या प्रकरणावर उत्तर देताना मंत्री अतुल सावे म्हणाले की, हा प्रकार अत्यंत गंभीर असून शासनाच्या वतीने सखोल चौकशी करण्यात येईल. संबंधित दोषींवर तातडीने कडक कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शासनाची फसवणूक करून दिव्यांग प्रमाणपत्रे मिळविल्याचे उघड झाले असून, अनेकांनी या प्रमाणपत्रांचा वापर करून शासकीय सुविधांचा गैरवापर केल्याची माहिती समोर आली आहे.

या गंभीर प्रकरणाबाबत आमदार ओगले यांनी अधिवेशनात आवाज उठवत सरकारचे लक्ष वेधले.

# डाळिंब उत्पादनाबरोबर प्रक्रियेकडे लक्ष दिल्यास शेतकरी अधिक सक्षम होतील- डॉ. शिर्के



**राहुरी । रयत समाचार**

डाळिंब हे विविध औषधी गुणधर्म, जीवनसत्त्वे आणि खनिजांनी समृद्ध असल्यामुळे आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे फळ ठरते. सध्याच्या आरोग्यजागृतीच्या काळात डाळिंबाला वाढती मागणी असून बाजारात या फळाला चांगला दर मिळत आहे. प्रक्रियायुक्त पदार्थांना देश-विदेशात मोठी मागणी असून फळापेक्षा प्रक्रियेतून तयार झालेल्या उत्पादनांना अधिक किंमत मिळते.

डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांनी प्रक्रियेकडे लक्ष दिल्यास त्यांचा आर्थिक सक्षमीकरणाचा मार्ग अधिक भक्कम होईल, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या उद्यानविद्या विभागांतर्गत इंडो-इस्राईल कृषी प्रकल्प, महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळ, डाळिंब गुणवत्ता केंद्र आणि अखिल भारतीय समन्वित कोरडवाहू फळे संशोधन प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान व मनुष्यबळ विकास कार्यक्रमांतर्गत डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांसाठी तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या प्रशिक्षणाच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलताना डॉ. शिर्के यांनी डाळिंब प्रक्रियेत असलेल्या संधींचा आढावा घेत शेतकऱ्यांना प्रक्रियाक्षेत्राकडे वळण्याचे आवाहन केले.

उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी. टी. पाटील म्हणाले की, फळपिकांची लागवड करताना भविष्यातील नुकसान टाळण्यासाठी योग्य पिकाची, जमिनीची आणि वाणाची निवड अत्यंत महत्त्वाची असते. स्पर्धेच्या या युगात टिकण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने उत्पादन व देखभाल गरजेची असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात डॉ. एस. पी. गायकवाड, डी. आर. पाटील (सहाय्यक कृषी अधिकारी) उपस्थित होते. तीन दिवस चालणाऱ्या या प्रशिक्षणात तज्ज्ञांकडून डाळिंब लागवड, उत्पादन व्यवस्थापन आणि प्रक्रियेवरील मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सूत्रसंचालन डॉ. प्रकाश मोरे यांनी केले, तर आभार डॉ. अजय हजारे यांनी मानले. यावेळी डॉ. सचिन मगर, डॉ. सुवर्णा देवरे तसेच कानडगाव, निंभेरे आणि तांभेरे येथील २५ डाळिंब उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

# असंघटित कामगारांचा आधारवड हरपला

असंघटित कामगारांच्या हक्कासाठी झगडणारे ज्येष्ठ कामगार नेते, पुरोगामी चळवळीचे आधारवड, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाबा आढाव यांचे सोमवार, ता. ८ डिसेंबर रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ९५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने कष्टकरी, श्रमजीवी वर्गासाठी आयुष्य वेचणारे नेतृत्व हरपले. त्यांच्या निधनाने या वर्गाचेच नव्हे तर संपूर्ण समाजाचे मोठे नुकसान झाले आहे. डॉ बाबा आढाव यांनी कष्टकरी, श्रमजीवी वर्गासाठी जितके कार्य केले तितके कार्य याआधी कोणीही केले नाही. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा वारसा सांगणाऱ्या बाबा आढाव यांचा जन्म १ जून १९३० रोजी पुण्यात झाला. ते नाना पेठेतील नामांकित आयुर्वेदिक डॉक्टर होते. बाबा आढाव यांनी वयाच्या २३ व्या वर्षीच म्हणजे १९५३ सालीच सामाजिक चळवळीत भाग घ्यायला सुरुवात केली

त्यावेळेच्या तरुणांना समाजवादी विचारांची भुरळ पडली होती तशी भुरळ बाबा आढाव यांनाही पडली म्हणूनच त्यांनी समाजवादी पक्षात प्रवेश करून सामाजिक कार्यास सुरुवात केली. १९७० सालापर्यंत बाबा आढाव समाजवादी पक्षाबरोबर राहिले या काळात त्यांनी अनेक आंदोलन केले. ते पुण्याचे नगरसेवकही होते. नाना पेठ हा शहरातील बाजार पेठेचा भाग असल्याने अनेक व्यवसायातील कामगार, हमाल तिथे येत असत त्यामुळे कामगारांना येणाऱ्या अडचणी बाबा आढाव यांच्या लक्षात येऊ लागल्या हमालांचे शोषण होऊनही त्यांना कुठलेही कायदेशीर संरक्षण नसल्याचे त्यांनी पाहिले. या गोष्टीचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला. अखेर १९६६ साली त्यांनी आपला चांगला चाललेला डॉक्टरकीचा व्यवसाय सोडला आणि कामगारांच्या पाठीशी उभे राहण्याचे ठरवले.

१९७० नंतर मात्र बाबा आढाव यांनी राजकारणातून फारकत घेऊन कष्टकरी श्रमजीवी वर्गासाठी अर्थात असंघटित वर्गासाठी काम करण्याचे ठरवले. या वर्गाला त्यांचे अधिकार आणि हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली. नडलेल्या, नाकारलेल्या उपेक्षित घटकांपर्यंत स्वातंत्र्याचे नि सार्वभौम लाभ पोहचवण्याचे काम त्यांनी केले. हमालपंचायत, रिक्षा पंचायत, मोलकरीण पंचायत, कागद -पत्रा - काचवेचक, कष्टकरी पंचायत, पथारी व्यावसायिक पंचायत, टेम्पो पंचायत अशा अनेक असंघटित कामगाराच्या संघटना त्यांनी बांधल्या. या संघटनांच्या माध्यमातून त्यांनी असंघटित कामगारांना न्याय, सन्मान आणि सामाजिक सुरक्षा मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. हमाल पंचायतची स्थापना ही त्यांच्या कार्याचा महत्वाचा टप्पा ठरली.

हमाल पंचायतीच्या माध्यमातून बाबा आढाव यांनी पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील हमालांना संघटित केले. जातीय भेदभावाविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी एक गाव एक पाणवठा या क्रांतिकारी चळवळीचे नेतृत्व केले आणि समाजात समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. हा प्रयत्न त्यांनी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत सुरू ठेवला. महाराष्ट्रातल्या सामाजिक चळवळीत जवळपास पाच दशकांहून अधिक काळ बाबा आढाव यांचा सहभाग राहिला. बाबा आढावांच्या नेतृत्वाचे सर्वात मोठे महत्त्वाचे वैशिष्टे म्हणजे त्यांना असणारे राजकीय व्यवहार्यतेचे भान.

असंघटित कामगारांचे संघटन करताना शोषणाच्या कमी अधिक प्रमाणात लढत राहणे, असंघटितांसाठी लढताना शासनाशी आर्थिक मागण्या न करता स्वायत्तपणे सहकारी संस्थांमधून सामाजिक सुरक्षितता मिळवण्याचे प्रयत्न करणे आणि सामाजिक प्रबोधन घडवणे. संशोधन संस्थांचे सहाय्य घेऊनही संघर्षात्मक राजकारणाचे प्राधान्य कायम ठेवणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे पक्षीय राजकारणात सहभागी न होता देखील कळीच्या मुद्यावर राजकीय भूमिका घेण्याचे धाडस दाखवणे अशा सर्व पातळ्यांवर बाबा आढावांमध्ये व्यवहार्यतेचे भान स्पष्ट होत जाते.

संघर्ष आणि प्रबोधन अशा दुहेरी मार्गानी झालेली त्यांच्या नेतृत्वाची वाटचाल पुरोगामी राजकारणाचा एक महत्वाचा दस्तऐवज आहे. बाबा आढाव यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील अढळ तारा निखळला. त्यांच्या निधनाने असंघटित कामगारांचा आधारवड हरपला. बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
**समाजसंवाद**



# सिद्धी तांबेची महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल संघात निवड

**कोपरगाव । किसन पवार**

संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स संचलित संजीवनी इंटरनॅशनल स्कूल, शिर्डी येथील सिद्धी महेंद्र तांबे हिची १७ वर्षे वयोगटातील महाराष्ट्र राज्य सॉफ्टबॉल मुलींच्या संघात निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्य क्रीडा परिषद, पुणे आणि विभागीय क्रीडांगण, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे घेतलेल्या निवड चाचणीत राज्यभरातून तब्बल १६० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी केवळ १६ जणींची अंतिम निवड झाली असून सिद्धीने या स्पर्धकांमध्ये आपले स्थान निश्चित केले.

शाळेने दिलेल्या माहितीनुसार, संजीवनी इंटरनॅशनल स्कूलच्या सॉफ्टबॉल मुलींच्या संघाने जिल्हा व विभागीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तर गाठला. त्या स्पर्धांदरम्यान सिद्धीच्या दमदार खेळाने निवड समितीचे लक्ष वेधले. तिच्या निवडीमुळे संजीवनी संस्थेला राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली असून आगामी राष्ट्रीय स्पर्धेसाठी शाळा आणि विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. छत्तीसगड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेत सिद्धी महाराष्ट्र संघातून चमक दाखवणार आहे.

> सिद्धी तांबेची राज्य सॉफ्टबॉल संघातील निवड ही तिच्या प्रतिभा, जिद्द आणि कठोर परिश्रमांचे फलित आहे. तिच्या यशामुळे संस्थेचा गौरव वाढला असून ती राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राचे नाव उज्वल करेल, असा आम्हाला विश्वास आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकविद्यार्थीशिक्षक यांच्या समन्वयातून काम करणे हीच संजीवनी इंटरनॅशनल स्कूलची प्राधान्याची दिशा आहे.
> **- डॉ. मनाली कोल्हे,**
> **संचालिका, संजीवनी ग्रुप ऑफ स्कूल्स**

सिद्धीच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सिद्धी तसेच तिचे आई-वडील महेंद्र व पूर्णिमा तांबे यांचे अभिनंदन केले. संजीवनी ग्रुप ऑफ स्कूल्सच्या संचालिका डॉ. मनाली अमित कोल्हे यांनी सिद्धीचा सत्कार करून राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्राचार्या रीना राजपूत आणि क्रीडा शिक्षक विरूपक्ष रेड्डी उपस्थित होते.

# क्रीडा महोत्सवात न्यू आर्ट्सचे यश



**शेवगाव । नरहरी शहाणे**

न्यू आर्ट्स महाविद्यालय, शेवगाव येथील विद्यार्थी अंकित कृष्णप्रकाश गुप्ता याने नांदेड येथे पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सवात ४०० मीटर धावण्याच्या प्रकारात उल्लेखनीय कामगिरी करत रौप्यपदक पटकावले. या यशामुळे महाविद्यालयाने राज्यपातळीवरील क्रीडा स्पर्धेत आपला ठसा उमटवला आहे. अंकितच्या या दैदिप्यमान यशाबद्दल अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पुरुषोत्तम कुंदे, उपप्राचार्य डॉ. युवराज सुडके तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या यशामागे महाविद्यालयाचे क्रीडा संचालक प्रा. दादासाहेब लोखंडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# सार्वजनिक बांधकाम खात्यात लाचखोरी? सोशल मीडियावर मनसेकडून व्हिडिओ ट्विट

नागपूर । शफीक बागवान

राज्याचे हिवाळी अधिवेशन २०२५ सुरु आहे. आज हिवाळी अधिवेशनाचा दुसरा दिवस असून आजपासून कामकाजाला सुरुवात होणार आहे. अधिवेशनात सत्ताधारी विरोधकांमध्ये जुंपण्याआधीच मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेकडून आज कॅश बॉम्बचा धमाका करण्यात आला.

एकीकडे शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी शिंदेंचे आमदार महेंद्र दळवींचा कॅशसह व्हिडिओ समोर आणला आहे. तर दुसरीकडे मनसे नेते संदीप देशपांडे यांनी पीडब्लुडीच्या अधिकाऱ्यांचा लाच घेतानाचा व्हिडिओ समोर आणलाय. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली. हिवाळी अधिवेशनात ठाकरे बंधूंच्या नेत्यांच्या कॅश बॉम्बवर जोरदार चर्चा होण्याची शक्यता आहे. यामुळे हिवाळी अधिवेशन तापणार असल्याची चिन्ह दिसून येत आहेत.

महाराष्ट्रात भ्रष्टाचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. सामान्य नागरिक रोजच्या रोज खड्ड्यातून, रस्त्यातून नव्हे प्रवास करतात, आणि चांगले रस्ते देणे ज्यांची जबाबदारी आहे असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मात्र सर्रास भ्रष्टाचार करत असल्याचे धक्कादायक वास्तव उघड झाले आहे. हा गंभीर खुलासा महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे नेते संदीप देशपांडे यांनी केला.

# क्रिकेट जगतात भूकंप ! बीसीसीआयच्या नाकाखाली मोठा घोटाळा उघड

**पुडुचेरी । रयत समाचार**

भारतीय क्रिकेटची शिस्तबद्ध रचना आणि टॅलेंटला योग्य मंच देण्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या बीसीसीआयच्या नाकाखाली मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. इंडियन एक्सप्रेसच्या तपासात पुडुचेरी क्रिकेटमध्ये पैशांच्या जोरावर खेळाडूंना टीममध्ये स्थान दिले जात असल्याचा धक्कादायक खुलासा झाला आहे.

चौकशीत उघड झाले की, १.२ लाख रुपयांच्या पॅकेजमध्ये बाहेरील राज्यातील खेळाडूंना 'स्थानिक' दाखवण्यासाठी बनावट घराचे पत्ते आणि खोटे एलिजिबिलिटी सर्टिफिकेट तयार केले जात होते. काही प्रशिक्षक आणि खाजगी अकादम्यांच्या मदतीने ही समांतर व्यवस्था गेल्या काही वर्षांपासून चालू असल्याची माहिती मिळाली.

तपासात एक धक्कादायक बाब समोर आलीवेगवेगळ्या संघांतील तब्बल १७ खेळाडूंनी एकाच आधार कार्डाचा पत्ता वापरून नोंदणी केली होती. घरमालकांच्या चौकशीत भाडे न भरल्याने हे खेळाडू महिन्यांपूर्वीच घराबाहेर काढल्याचे समोर आले.

या फसवणुकीमुळे पुडुचेरीतील खऱ्या स्थानिक खेळाडूंना संघात संधीच मिळाली नाही. गेल्या चार वर्षांत पुडुचेरीने खेळलेल्या २९ रणजी सामन्यांमध्ये फक्त ४ खेळाडू हे जन्माने पुडुचेरीचे होते. यंदाच्या वीनू मांकड ट्रॉफीत तर ११ पैकी ९ खेळाडू बाहेरील राज्यांतून आणले होते.

बीसीसीआयच्या कडक निवासस्थान नियमांना चुकवून केलेल्या गैरव्यवहारामुळे राज्यातील क्रिकेट संस्कृतीवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तपास जसजसा पुढे जाईल, तसतसे आणखी धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# ८ कोटींची लाच घेताना रंगेहाथ पकडलं; न खाऊंगा न खाने दूंगा घोषणा निष्फळ

**पुणे । शफीक बागवान**

तब्बल ८ कोटी रुपयांची लाच मागण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार पुण्यात समोर आला आहे. पुणे येथील धनकवडीमधील एकता सहकारी गृहनिर्माण संस्थेत हा प्रकार घडला. एकता सहकारी गृहनिर्माण संस्थेत ३३ नवीन सभासदांना शेअर सर्टिफिकेट देणे व भविष्यातील लिलावात हवी ती व्यक्तिला तो मिळवून देण्यासाठी सहकार विभागाने नेमलेल्या लिक्विडेटर व माजी प्रशासकाने तब्बल ८ कोटी रुपयांची लाच मागितल्याचा धक्कादायकप्रकार उघड झाल्याने एकच खळबळ उडाली आहे . सध्याचे लिक्विडेटर विनोद माणिकराव देशमुख (वय ५०) आणि माजी प्रशासक, सरकारी पॅनेल ऑडिटर भास्कर राजाराम पोळ (वय ५६ ) या दोन्ही आरोपींविरुद्ध विश्रामबाग पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील अँडव्हान्स ३० लाख रु. रोख रक्कम स्विकारताना दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. तक्रारदार सभासद हे सप्टेंबर २०२५ मध्ये पोळ यांच्याकडे चौकशीस गेले असता पोळ यांनी स्वतःसाठी व सध्याचे लिक्विडेटर देशमुख यांच्यासाठी ३ कोटी, तर भावी लिलावात तक्रारदार सांगतील त्या व्यक्तीला मालमत्ता देण्यासाठी ५ कोटी असे एकूण ८ कोटी रुपयांची लाच मागितली. याबाबत तक्रारदारांनी ५ डिसेंबर २०२५ रोजी पुणे एसीबीकडे तक्रार नोंदवली. एसीबीने प्रथम लाचेची पडताळणी केली व त्यात ८ कोटींची मागणी खरी असल्याचे निष्पन्न झाले. तडजोडीअंती ३० लाख रुपये अँडव्हान्स देण्याचे ठरले. एसीबीने शनिवार पेठेतील तक्रारदारांच्या ऑफिससमोर देशमुख स्वतः पैसे घेण्यासाठी हजर झाले. त्यांनी पंचांसमोर ३० लाखांची रोख रक्कम स्वीकारताच एसीबीच्या पथकाने दोन्ही आरोपींना अटक केली.

पुणे विभागातील सहकारी संस्थांच्या लिक्विडेशन प्रक्रियेत एवढ्या प्रचंड रकमेची लाच मागितल्याची ही पहिलीच घटना मानली जात आहे.

२०२० मध्ये सभासदत्वा वरून वाद निर्माण झाल्याने सहकार विभागाने सोसायटीवर प्रशासक नेमला. नंतर २०२४ मध्ये सोसायटी लिक्विडेशन मध्ये काढण्यात आली आणि विनोद देशमुख यांची लिक्विडेटर म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तक्रारदार व इतर ३२ सभासदांनी २०२३ मध्ये तत्कालीन प्रशासक भास्कर पोळ यांच्याकडे शेअर सर्टिफिकेट साठी अर्ज केला होता. पोळ यांनी इतर ३२ जणांचे अर्ज निकाली काढले, मात्र तक्रारदार सुनावणीस हजर नसल्याने कारण देत त्यांचा अर्ज प्रलंबित ठेवला होता.

पुणे एसीबी अधीक्षक शिरीष सरदेशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने कारवाई करत दोघांना अटक केली.

# 'शांतता पुणेकर वाचत आहेत' उपक्रम; सहभागी होण्याचे आवाहन

**पुणे । रयत समाचार**

राष्ट्रीय पुस्तक ट्रस्ट, शिक्षण मंत्रालय, भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'पुणे पुस्तक महोत्सव २०२५' १३ ते २१ डिसेंबर २०२५ दरम्यान फर्ग्युसन कॉलेज येथे आयोजन करण्यात येणार आहे. पुणे पुस्तक महोत्सवाचे तिसरे वर्ष असून गेल्या तीन वर्षांपासून समाजामध्ये वाचन संस्कृती रुजविण्याकरता पुणे पुस्तक महोत्सवाचे मोठे योगदान आहे.

पुणे पुस्तक महोत्सवाचा एक भाग म्हणून दरवर्षी 'शांतता पुणेकर वाचत आहेत' उपक्रमाचे ९ डिसेंबर २०२५, मंगळवार, सकाळी ११ ते १२ या वेळेत आयोजन केले जाणार आहे, यामाध्यमातून समाजातल्या सर्व घटकांनी आप-आपल्या ठिकाणी आपल्या आवडीचे पुस्तक वाचावे यातून हे अभिप्रेत आहे.

# हडफेडीतील २६ बळी आणि आम्ही गोवेकर

**आमचे मत नाही, फक्त प्रश्न असतील! २५ मृत्यू... हा केवळ आकडा नाही! बागा (हडफडे) येथील आगीत २५ जणांनी जीव गमावला, पण खरं तर तिथे २६ कुटुंबांची दुनिया जळून खाक झाली. आणि आमचे प्रशासन? नेहमीप्रमाणे फक्त चौकशीचे सोपस्कार करतंय!**

येत्या २० तारखेला जिल्हा पंचायत निवडणुकीसाठी जे उमेदवार तुमच्या दारात मते मागायला येतील, त्यांना आधी डोळ्यात डोळे घालून हा जाब विचारा:

हडफडेत जे घडलं, त्याला जबाबदार कोण? अनधिकृत बांधकामांना अभय कोणाचे? फक्त मते हवीत, पण आमच्या जीवाची गॅरंटी काय?

सत्तेच्या मस्तीत असलेल्यांना सांगा, जोपर्यंत या २५ चितांना न्याय मिळत नाही, जोपर्यंत दोषींना शिक्षा होत नाही, तोपर्यंत आमचे मत नाही, फक्त प्रश्न असतील!

गोवेकरांनो, आता फक्त हळहळू नका, तर धारेवर धरा! हडफडेच्या अग्नितांडवात २५ निरपराधांचा बळी ही केवळ दुर्घटना की सरकारी अनास्थेची हत्या?

हडफडे, बागा येथील अग्नितांडवाची बातमी वाचून कोणाचेही मन सुन्न होईल, पण दुर्दैवाने आपल्या निगरगट्ट प्रशासनाला आणि सत्तेच्या मस्तीत असलेल्या सरकारला याचे सोयरसुतक आहे का, हाच खरा प्रश्न आहे. वृत्तपत्रे आणि सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या ज्वाळांपेक्षाही जास्त दाहक सत्य हे आहे की, २५ मृत्यू हा केवळ एक आकडा नाही; ती २५ हसती-खेळती घरे उद्ध्वस्त झाली आहेत, २५ कुटुंबांची आयुष्यभराची स्वप्ने एका क्षणात जळून खाक झाली आहेत.

ही घटना नैसर्गिक आपत्ती नव्हती, तर ती मानवनिर्मित चुका आणि प्रशासकीय दुर्लक्षतेचा परिणाम आहे. आज जेव्हा २५ निष्पाप लोकांचे जीव गेले आहेत, तेव्हा सरकार नेहमीप्रमाणे चौकशी समिती नेमून आणि मृतांच्या नातेवाईकांना आर्थिक मदतीची घोषणा करून आपली जबाबदारी झटकू पाहत आहे. पण आमचा सवाल थेट मुख्यमंत्री आणि संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना आहे फक्त चौकशीचे सोपस्कार आणि कागदी अहवाल पुरेसे नाहीत; या मृत्यूंचे उत्तर कठोर कारवाई, जबाबदारी निश्चिती आणि दोषींना थेट शिक्षेतूनच मिळाले पाहिजे. आग लागली तेव्हा फायर ऑडिट झाले होते का? परवानग्या कोणाच्या आशीर्वादाने मिळाल्या होत्या? या प्रश्नांची उत्तरे मिळायलाच हवीत.



**दिनेश शिवा जल्मी**
प्रियोळ
८९९८६ ९९४०५
**प्रासंगिक**

येत्या २० तारखेला जिल्हा पंचायत निवडणुका होऊ घातल्या आहेत. उमेदवार मते मागायला दारात येतील. पण त्याआधी या २५ चितांचा जाब त्यांना विचारा. सत्तेची स्वप्ने पाहणाऱ्या उमेदवारांना आणि त्यांच्या नेत्यांना आता लोकांनी धारेवर धरण्याची वेळ आली आहे.

त्यांना सांगा, "तुमची दिशा चुकत आहे!" जेव्हा सामान्य माणसाचा जीव सुरक्षित नाही, तेव्हा तुमच्या निवडणुकीच्या राजकारणाला काहीही अर्थ उरत नाही.

जे अधिकारी आणि राजकारणी या दुर्घटनेकडे डोळेझाक करत आहेत, त्यांनी हे लक्षात ठेवावे की जनतेचा आक्रोश हा त्या आगीपेक्षाही भयानक असू शकतो. आज जी कुटुंबे अस्ताव्यस्त झाली आहेत, ज्यांचे आधारवड हरपले आहेत, त्यांच्या दुःखाची कल्पनाही करणे कठीण आहे. आम्ही सर्व गोवेकर या कठीण प्रसंगी त्या पीडित कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. त्यांच्या वेदना या आमच्याही वेदना आहेत.

**सरकारने आता जागे व्हावे. मते मागण्याआधी, सुरक्षिततेची हमी द्यावी. कारण गोवेकर आता गप्प बसणार नाही, तो जाब विचारणारच!**

# फळपिक विमा योजनेस मुदतवाढ

**अहमदनगर । रयत समाचार**

आंबिया बहार २०२५-२६ अंतर्गत पुणे विभागातील अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यांमध्ये संत्रा पिकासाठी राबविण्यात येणाऱ्या पुनर्रचित हवामान आधारित फळपिक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकऱ्यांना पिक विमा पोर्टलवर नोंदणी करता येत नव्हती. शेतकऱ्यांचा सहभाग वाढावा म्हणून या दोन्ही जिल्ह्यांतील संत्रा पिकासाठी नोंदणीची अंतिम मुदत १५ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती अधीक्षक कृषि अधिकारी विजयकुमार राऊत यांनी दिली. शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

आपला वाढदिवस
रक्तदानाने साजरा करा